दै. देशोन्नती दि. 11.05.25

# नांदेड परिक्षेत्रात पहिल्या आठवड्यात १ कोटीहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त

## नांदेड जिल्ह्यात ९७ कारवाया करून ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड**ः विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात १ ते ३१ मे दरम्यान अवैध व्यवसाय विरोधात अभियान राबविण्याचे आदेश दिले असून त्यानुसार पहिल्या आठवड्यात ३९४ केसेस करून १ कोटी २० लाख ७४ हजार ८३ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये नांदेड जिल्ह्यात ९७ केसेस करून ६ लाख ५ हजार ४७८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

नांदेड परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, क्रिकेट बॅटिंग, गुटखा, अमली पदार्थ, व्यश्या व्यवसाय, वाळू उपसा आदींवर आळा घालण्यासाठी विशेष पोलिस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी १ ते ३१ मे या कालावधीत अवैध व्यवसाय विरोधी अभियान - १ चे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार १ ते ७ मे या कालावधीत परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चार जिल्ह्यात कारवाया करण्यात आल्या.

### नांदेड परिक्षेत्रावर पोलिस उपमहानिरीक्षकांची करडी नजर

नांदेड जिल्ह्यात ९७ केसेस करून ९८ आरोपींकडून ६ लाख ५ हजार ४७८ रुपये, परभणी जिल्ह्यात १०६ केसेस करून ११० आरोपींकडून ६० लाख १९ हजार ८१० रुपये, हिंगोली जिल्ह्यात १०२ केसेस करून १०२ आरोपींकडून ३४ लाख २६ हजार ५९० रुपये व लातूर जिल्ह्यात ८९ केसेस करून ९१ आरोपींकडून २० लाख २२ हजार २०५ रुपये असा एकूण परिक्षेत्रात ३९४ केसेस करून ४०१ आरोपींकडून १ कोटी २० लाख ७४ हजार ८३ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.